**विषय** :- पनवेल महानगरपालकेच्या धर्तीवर महानगरपालिकेच्या वैद्यकीय अधिकारी यांना महानगरपालिकेच्या आकृतीबंधामध्ये वर्ग-१ मध्ये समावेशन करणेबाबत.

**प्रस्तावना**

उपरोक्त विषयांन्वये महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग शासन निर्णय क्र. भिनिम-२०२२/प्र.क्र.१०१/नवि-२३ दि. ३०/११/२०२२ रोजी पदनिर्मिती आदेश व महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग शासन निर्णय क्र. भिनिम-२०२२/प्र.क्र.९४/नवि-२३ दि. १४/१२/२०२२ भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२२ या नियमास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ४५४, ४५५, ४५६, ४५७ (३) व ४६५ अन्वये शासन मान्यता देण्यात आलेली आहे.

उक्त मंजूर आदेशामध्ये मेडीकल ऑफिसर/ज्युनियर मेडीकल ऑफिसर हे पद वर्ग-२ मध्ये दर्शवण्यात आलेले आहे. त्यानुसार या महानगरपालिकेती कार्यरत मेडीकल/ज्युनिअर मेडिकल ऑफिसर यांनी पनवेल महानगरपालकेच्या धर्तीवर महानगरपालिकेच्या वैद्यकीय अधिकारी यांना महानगरपालिकेच्या आकृतीबंधामध्ये वर्ग-१ मध्ये समावेशन करणेबाबत विनंती अर्ज सादर केलेला आहे.

सदर अर्जाच्या अनुषंगाने या कार्यालयाकडील जा.क्र./भिनिशमनपा/आस्थापना/३०७०/२०२४ दि. २५/०९/२०२४ अन्वये या महानगरपालिकेच्या मंजूर सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम २०२२ मेडीकल/ज्युनियर मेडीकल ऑफिसर या पदाची शैक्षणिक अर्हता मान्यताप्राप्त विद्यापिठाची वैद्यक पदवी (एम.बी.बी.एस.) व महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल अधिनियम अंतर्गत नोंदणी आवश्यक, महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल अधिनियम अंतर्गत नोंदणी आवश्यक, शासकीय/निमशासकीय/स्थानिक स्वराज्य संस्था/खाजगी रुग्णालयातील संबंधित विषयातील कामकाजाचा किमान २ वर्षाचा अनुभव आवश्यक व मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक अशी आहे. या महानगरपालिकेच्या आस्थापनेवर मेडीकल ऑफिसर/ज्युनिअर मेडिकील ऑफिसर हे एकुण ४ अधिकारी/कर्मचारी सन २००७ पासून कार्यरत असून ४ अधिकारी हे उक्त शैक्षणिक अर्हता धारण करत आहे.

तरी भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिके मधील कार्यरत मेडीकल/ज्युनियर मेडीकल ऑफिसर वर्ग-२ हि पदे वर्ग-१ मध्ये समावेषन करणेकामी दुरुस्तीकामी पाठवण्यित आलेल्या प्रस्तावास सद्य:स्थितीत मा. महासभा व मा. स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च कलम ४५२ अ (१) नुसार प्रशासकीय मान्यतेकरीता सादर करण्यात आलेला आहे.

**प्रशासकीय ठराव क्रमांक** ६७२ **दिनांक** १५ / १० **/२०२४**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिके मधील कार्यरत मेडीकल/ज्युनियर मेडीकल ऑफिसर वर्ग-२ हि पदे वर्ग-१ मध्ये समावेषन करणेकामी जा.क्र./भिनिशमनपा/आस्थापना/३०७०/२०२४ दि. २५/०९/२०२४ नुसार शासनास पाठविण्यात आलेले प्रस्ताव सद्य:स्थितीत मा. महासभा व मा. स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्र. एमसीओ २०२०/प्र.क्र. ७१ (भाग-१) नवि-१४, दि. ०६/०६/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च कलम ४५२ अ (१) तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी अजय वैद्य प्रशासक तथा आयुक्त भिवंडी निमामपूर शहर महानगरपालिका या सोबत जोडलेल्या प्रस्तावास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

(अजय वैद्य)
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका**